REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# "पुणे शहरातील मंगळवार पेठ या विभागातील बुध्दधम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे झालेले परिवर्तनएक अभ्यास"



नंदागेना गायकवाड[१] , डॉ. शशिकांत लोखंडे[२] , डॉ. माधवी रेणावीकर[३]
[१]संशोधक
[२,३]संशोधन मार्गदर्शक , टि.म.वि., पुणे.

**प्रस्तावना ः**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दधम्माची दीक्ष घेतली त्यावेळी एक महत्वपूर्ण घोषणा केलीकी, मला संपुर्ण भारत बौध्दमयकरायचा आहे. या घोषणेचा वास्तविक अर्थकाय आहे.त्याच्या पाठीमागेकोणता उद्देश होता? जातीयग्रस्त समाजाला समोर ठेवून भारताला बौध्दमयकरण्याचेध्येय पूर्णझाले? काअपूर्ण आहे? धम्मदिक्षाघेतल्यानंतर डॉ.बाबासाहेबांचे ६ डिसेंबर १९५६ साली महापरिनिर्वाण झाले धम्मदिक्षेच्या ५१ व्या दिवशीहा समाज पोरका झाला. स्वत:ला तथागत बुध्दाचेतसेचडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणणारे परंपरावादी लोक लक्षपूर्तीसाठीकामकरण्याचे सोडूनदररोजतथागत भगवान बुध्दाची वंदनाघेण्यालाच आंदोलन म्हणून मार्गक्रमणकरत आहेत. धर्म परिवर्तनकरण्यामागे आपला उद्देश जाहिर करतानाडॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात मी धर्म परीवर्तन यासाठीकेलेकी, मला समता पाहिजे, स्वातंत्र्य पाहिजे, न्याय पाहिजे, बंधुता पाहिजे या चारही बाबी मला तथागतविचारातदिसतात म्हणून मी बुध्दधम्माची दिक्षाघेतली आहे.

दुसरीकडे आपण पाहतो की, भारतीय संविधान लिहिताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत लिहिताना या संविधानाच्या माध्यमातूनदेशात समता, स्वातंत्रता,बंधुता आणिन्यायावर आधारीत समाज आणि राष्ट्रनिर्माणकरण्यासाठीहे संविधानदेशाला सुपूर्दकरीत आहे.

आपण ही महत्वपूर्ण बाब समजूनघेण्याचा प्रयत्नकेला पाहिजे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीकेलेल्या धर्म परिवर्तनाचेकार्य असो, संघर्ष असो, आंदोलन असोकिंवाअधिनियमकरण्याची बाब असो प्रत्येकांच्या समोरएकनिश्चित उद्देश आहे आणितो उद्देश बदलतानादिसत नाही. तो उद्देश आहे समता, स्वतंत्रता, बंधुता आणिन्यायावर आधारीत समाज आणि राष्ट्रनिर्माणकरणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात हा उद्देश पूर्णकरण्यासाठी मी धर्मपरीवर्तनकरीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिपादीतविचारातून आपल्याला कार्याची समीक्षा करण्याचा आधार मिळतो. ज्या उद्देशपूर्तीसाठीत्यांचे अनुयायीकायकरतात.

आपणदररोज वर्तमान पत्र वाचतो. दूरदर्शनचे वेगवेगळे चॅनल पाहतो. यामध्ये असा एक ही दिवसनसतोकी, ज्या बातम्यामध्ये लाच, भ्रष्टाचार, बलात्कार व अंधश्रध्देतूननिर्माणझालेली घटना नाही. या सर्व गोष्टींसाठी समाजाला बुध्दधम्माची गरज आहे.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सामाजिक व राजकीय चळवळीच्या आधारे ज्या दुर्लक्षीत समाजाला, न्याय हक्क व स्वाभिमान मिळवून दिलात्याचे आज परीक्षणकेलेतर असे लक्षात येईल की, न्याय हक्क या समाजातून अनेक लोक उच्च शिक्षितझाले, विद्याभूषित झाले सधनझाले, नोकरीत व कार्यालयात लौकीक, मिळविला मग ही माणसं बाबासाहेबांचे भारत बौध्दमयकरण्याचे स्वप्न साकारकरण्याचे प्रयत्नकरतातका?

आज देशात ज्या अनैसर्गिक घटनाघडतात, अमानुष्य घटनाघडतात. उदा- खैरलांजी, जवखेडा,दादरी हत्याकांड घडतात. यासर्वांमधूनतरूणजाण्यासाठी बुध्दाचाधम्म एकमेव मार्ग आहे.

१९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीचवदार तळयाच्या मुक्तीचे आंदोलन सुरुकेले होते त्यावेळी आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांना संबोधितकरतानाडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीजे महत्वपूर्ण भाषण केले होते त्यामध्येदोन गोष्टी खूप महत्वपूर्ण आहेत पहिली गोष्ट ते म्हणतात, 'जागृतिचा अग्नी अखंड तेवत ठेवा'दूसरा महत्वपूर्णविचार सांगतातकी, विचारात परीवर्तनकेल्याशिवाय आचरणात परीवर्तन शक्य नाही. जरएखाद्या व्यक्तीचे आचरणचुकीचे आहे तीत्याचुकीच्या आचरणासत्या व्यक्तीचाचुकीचाविचारकारणीभूत आहे. चुकीचे आचरणकरणाऱ्या व्यक्तीला दोष दिला जाऊ शकत नाही. जर व्यक्तीचेचुकीचे आचरण बदलायचे असेलतरत्याच्यातल्या विद्यमानचुकीच्याविचाराला आधी बदलावे लागेल. जेव्हा त्या व्यक्तीचाविचार बदलेल तेव्हा त्याच्या आचरणात परीवर्तन होईल.

- **संकल्पना कार्यवाही व्याख्या :**

- पुणे महानगरपालिकेच्या विभागामधील बुध्द धम्मीय युवक युवती.
- पुणे महानगरपालिकेच्या विभागामधील प्रभाग क्र. २३ मधील बुध्द धम्मीय लोकवस्ती २२४,२२६,२२७,२२८ मंगळवार पेठ,नवीन मंगळवार पेठ,भिमनगर,कसबा पेठ,पुणे -११
- **बौध्दधर्मीय** : जे लोक पूर्वाश्रमीचे महार परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केल्यामुळे हे लोक नकळतआपोआप बुध्द धम्मीय झाले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा स्त्रोत मानतात. त्यांना आपले प्रेरणा स्त्रोत माणून त्यांचे धार्मिक कार्यक्रम बुध्द धम्मीय पध्दतीने करतात. ते लोक म्हणजे बुध्द धम्मीय होय.
- **धम्मपालन** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना बुध्द धम्माची दीक्षा दिली. त्यावेळी जे त्रिसरण आणि पंचशिल दिले. त्या पंचशिलाचे पालन करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे धम्मपालन होय.
- **युवक** : १८ ते ३५ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरी करणारे, रोजंदारी करणारे, बेरोजगार, सुशिक्षित, अशिक्षित, अविवाहीत तसेच विवाहित, तरूण वर्ग म्हणजे युवक होय.
- **युवती** : १८ ते ३५ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थीनी, नोकरी करणाऱ्या, रोजंदारी करणाऱ्या व गृहीणी, अविवाहीत तसेच विवाहित तरूणी म्हणजे युवक होय.
- **परिवर्तन** :बुध्द धम्माच्या पालनामुळे व्यक्तीमध्ये झालेला बदल म्हणजे परिवर्तन होय.

- **संकल्पनांच्या कार्यात्मक व्याख्या :**

**धम्म**

- धम्म म्हणजे शुध्द विचार
- धम्म म्हणजे तत्वज्ञान
- धम्म म्हणजे माणसाला सुखाने जगण्यास लागणारी
  आचार-संहिता अर्थात एक चांगली शिकवण.
- बुध्द धम्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे तो केवळ धर्म नसून एक महान सामाजिक सिध्दांत आहे.

- **अभ्यास विषयाची व्याप्ती :**

१. या अभ्यासामध्ये पुणे शहरातील मंगळवार पेठ या विभागातील बुध्द धम्मीय युवक-युवतींमध्ये धम्म पालनामुळे झालेला बदलांवर लक्ष केंद्रित केले आहे.
२. या अभ्यासातून बुध्द धम्मीय युवक-युवतीं आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांच्यामध्ये असणारा फरक जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.
३. बुध्द धम्मीय युवक-युवती आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांचा बुध्द धम्माकडे बघण्याचा दृष्टीकोन जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

● **अभ्यास विषयाचे महत्व :**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, करूणा, मैत्री, न्याय व निती, अशा मुलभूत तत्वावर आधारलेला बुध्द धम्म जगात श्रेष्ठतम जनकल्याणकारी आहे. जनकल्याण करणारा कार्य करीत असतो. या अनुषंगाने तथागत बुध्दांचा धम्म परिपूर्ण आहे. त्यांनी सांगितले की, मला ईश्वर नको. या पृथ्वीतलावर जन्मास आलेल्या प्रत्येक माणसाला सुख आणि शांती मिळाली पाहिजे व सर्वांनी सुखी राहिले पाहिजे. त्यांचा धम्म मानवजातीच्या कल्याणसाठी सहाय्यकारी होऊ शकतो. त्यात मानवाच्या मुक्तीचे द्वार खुले आहे. ज्यात मानवा-मानवात भेदभाव नसून समता आहे. तोच खरा धम्म हा धम्म संज्ञेस पात्र ठरु शकतो. तो धम्म म्हणजे बुध्द धम्म आहे. बुध्दाच्या विचाराला धर्माऐवजी धम्माची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगासमोर आणली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायांसोबत धम्मदिक्षा घेतली. एका पित्यांने आपल्या मूलांच्या हितासाठी जे जे करावे ते सर्व काही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. बाबासाहेबांनी शैक्षणिक सामाजिक आर्थिक परिस्थितीकडे वळले. धार्मिक परिस्थितीमध्ये समाजाची एकता असते. तथागत भगवान बुध्दाचा धम्म हा बहुजन हिताय बहुजन सुखाय आहे. धम्म हा सुरुवातीला गोड आहे मध्ये ही गोड आहे आणि शेवट ही गोड आहे ते सर्वत्र गोड आहे. या धम्माच्या पालनामुळे जनकल्याण होते.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे :**

१. बुध्द धम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे झालेल्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.
२. बुध्द धम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे झालेल्या आरोग्य विषयक परिवर्तनाचा अभ्यास करणे.
३. बुध्द धम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे झालेल्या परिवर्तनाचा समाज परिवर्तनासाठी कशा प्रकारे उपयोग झाला याचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

१. बुध्द धम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे शैक्षणिक आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये बदल झालेला दिसून येतो.
२. बुध्द धम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे आरोग्याच्या स्थितीमध्ये सुधारणा झालेली दिसून येते.
३. बुध्द धम्मीय युवक युवतींमध्ये धम्मपालनामुळे जे परिवर्तन झाले आहे त्या परिवर्तनाचा समाज परिवर्तनासाठी उपयोग झालेला दिसून येतो.

**संशोधन प्रश्न :**

१. मंगळवार पेठ, या विभागातील बुध्द धम्मीय युवक युवती बुध्द धम्माचे पालन करतात का?
२. मंगळवार पेठ, या विभागातील बुध्द धम्मीय युवक युवतीमध्ये बुध्द धम्माचे पालन केल्यामुळे कशा प्रकारे बदल झाला?
३. मंगळवार पेठ, या विभागातील बुध्द धम्मीययुवक युवतीमध्ये बुध्द धम्माचे पालन केल्यामुळे झालेल्या परिवर्तनाचा समाज परिवर्तनासाठी कशा प्रकारे उपयोग झाला?

**संशोधन पध्दती :**

१. संशोधन विषयक माहिती प्राथमिक आणि द्वितीय स्वरुपातून निवडली जाणार आहे.
२. ही माहिती बुध्द धम्माचे पालन करणाऱ्या युवक युवती यांच्याकडून संकलित केली जाणार आहे.
३. विषया संदर्भातील दुय्यम माहितीचे संकलन करण्यासाठी बुध्दधम्मया विषयावरील प्रकाशित पुस्तके, मासिके वर्तमानपत्रे शासकीय योजनांच्या प्रकाशीत प्रती, संकेत स्थळे या प्रकारे अभ्यास केला जाणार आहे.

४. **नमुना आराखडा :**
५. क्षेत्र : संशोधन अभ्यासासाठी पुणे शहरातील मंगळवार पेठ, हे क्षेत्र निवडले जाणार आहे.
६. **नमुना निवड :**
७. संशोधन अभ्यासासाठी पुणे शहरातील मंगळवार पेठ या विभागातील धम्म पालन करणारे ५० युवक ५० युवती यांची निवड केली जाणार आहे.

चर्चा व निरीक्षण सुचीचा उपयोग करण्यात येणार आहे.



LBP PUBLICATION

**अभ्यास विषयातील मर्यादा :**

- हा अभ्यास बुध्द धम्मीय युवक युवतींपुरताच मर्यादीत असेल.
- हा अभ्यास पुणे महानगर पालिकेच्या हद्दीतील मंगळवार पेठ या विभागात राहत असणाऱ्या बुध्द धम्मीय युवक युवतींपुरताच मर्यादीत आहे.
- हा अभ्यास पुणे महानगर पालिकेच्या हद्दीत असलेल्या मंगळवार पेठ या विभागात राहत असणाऱ्या बुध्द धम्मीय युवक युवतींपुरताच मर्यादीत आहे.

**सारणी**

**लिंगानुसारविभागणीदर्शविणारी सारणी**

**Gender**

| | | Frequency | Percent | Valid Percent | Cumulative Percent |
|---|---|---|---|---|---|
| Valid | Male | 50 | 50.0 | 50.0 | 50.0 |
| | Female | 50 | 50.0 | 50.0 | 100.0 |
| | Total | 100 | 100.0 | 100.0 | |

आपल्या देशातील स्त्री-पुरुष लोकसंख्येचे प्रमाण घटले आहे. म्हणजे कितीतरते हजाराला ९४० इतके आहे. सहा वर्षाखालील वयोगट हे प्रमाण हजाराला ९१४ इतके खाली आले आहे. तकूणात ४५ ते ४७ टक्के महिला आपल्या देशात आहेत. जवळपास ५० टक्केच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशातल्या महिलांना 'स्वतंत्र' नव्हे तर सह म्हणजे पुरुषांच्या बरोबरीचं स्थानदेण्याची आवश्यकता आहे. देशातील महिला सामाजिक, आर्थिक दृष्ट्या सक्षम, स्वावलंबी, आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत. ही अपेक्षा रास्तच आहे. भारतीय राज्यघटनेन सामाजिक समतेबरोबरच स्त्री-पुरुष समानतेच्या मूल्याचा पुरस्कारकेला आहे. हे समानतेच मूल्य भारतीय समाजाच्या मनीमानसी रुजवण, ही खरंतर आजची गरज आहे. तथापी, महिलांच्या मनात स्त्री समानतेच मूल्य रुजण, ही त्याहून महत्वाची गोष्ट आहे.

१) बुध्दधम्मीय युवक युवतींमध्येधम्मपालनामुळे होणारे परिवर्तन हे युवक-युवतींच्या संख्येचे प्रमाणदर्शविणारी सारणी.

वरील सारणीवरुन असेनिदर्शनास येतेकी, एकुण १०० निवेदकांपैकी ५० निवेदक पुरुष आहेत. तर ५० निवेदिका युवती म्हणजे स्त्रीया आहेत. लोकसंख्याकितीत्या प्रमाणात युवक / युवती आहेत.

**उत्तरदात्यांच्या शैक्षणिक सवलती विषयीचा दर्जादर्शविणारी सारणी**

Education

| | Frequency | Percent | Valid Percent | Cumulative Percent | Male | Female |
|---|---|---|---|---|---|---|
| Valid Primary | 31 | 31.0 | 31.0 | 31.0 | 12 | 19 |
| Secondary | 32 | 32.0 | 32.0 | 63.0 | 18 | 14 |
| Higher | 17 | 17.0 | 17.0 | 80.0 | 08 | 09 |
| Education | 15 | 15.0 | 15.0 | 95.0 | 09 | 06 |
| Graduate | 05 | 5.0 | 5.0 | 100.0 | 03 | 02 |
| Post Graduate | 100 | 100.0 | 100.0 | | 50 | 50 |
| Total | | | | | | |

**Family Education**

| | Frequency | Percent | Valid Percent | Cumulative Percent | Male | Female |
|---|---|---|---|---|---|---|
| Valid Primary | 53 | 53.0 | 53.0 | 53.0 | 28 | 25 |
| Secondary | 36 | 36.0 | 36.0 | 89.0 | 16 | 20 |
| Higher | 7 | 7.0 | 7.0 | 96.0 | 03 | 04 |
| Education | 4 | 4.0 | 4.0 | 100.0 | 03 | 01 |
| Graduate | 100 | 100.0 | 100.0 | 100.0 | 03 | 02 |
| Post Graduate | | | | | | |

**उत्तरदात्यांच्या आरोग्या विषयीचा दर्जादर्शविणारी सारणी**

**Diagnose sickness**

| | Frequency | Percent | Valid Percent | Cumulative Percent |
|---|---|---|---|---|
| Valid At Home | 93.0 | 93.0 | 93.0 | 93.0 |
| At | 7.0 | 7.0 | 7.0 | 100.0 |
| Dispensary | 100.0 | 100.0 | 100.0 | |
| Total | | | | |

**Family Diagnose sickness**

| | Frequency | Percent | Valid Percent | Cumulative Percent |
|---|---|---|---|---|
| Valid At Home | 65.0 | 65.0 | 65.0 | 65.0 |
| At | 31 | 31.0 | 31.0 | 96.0 |
| Dispensary | 4 | 4.0 | 4.0 | 100.0 |
| At Godmen | 100.0 | 100.0 | 100.0 | |
| Total | | | | |

विवाह या शब्दाची व्युत्पत्ती विअवह अशी आहे. ठराविक मार्गाच जीवन, कुळ, समाज, वाहून नेणे हा त्याचा अर्थ आहे. हिंदू विवाह पध्दतीत लग्न हा करारनसूनएक संस्कार आहे. पण माणूस संस्कार मानत नाही. तेव्हा त्यालादुसरा मार्ग दाखवावा लागतोतो म्हणजे कायदा. धर्म ही एकशिकवण आहे तरकायदा हा बडगा आहे. विवाह हा सामाजिक बंधन म्हणून स्विकारायचा आणितडजोडीने सांगड घालण्यासाठी विवाह विधीकरायचे. विवाह विधी मध्ये प्रामुख्याने वाङ्.निश्चय, देवक, सीमान्त पूजन, मर्धुपर्क, गोरीहर, अन्न:पटधारण, कन्यादान, फंकण बंधन, मगळसूत्र बंधन, विवाह होम (लाजाहोम), सप्तपदी, ऐरणीदान, गृहप्रवेश व लक्ष्मीपूजन असेविधीकेलेजातात. १४ ऑक्टोबर १९५६ ला देशभरातील लाखोदलित बांधवांनीनागपूरच्यादीक्षाभूमीवर हिंदू धर्माचात्यागकेला व बुध्दधम्माची दीक्षाघेतली. त्यामुळे त्यांनीजुनी विवाहाची पध्दत सुध्दा सोडूनदिली व नव्या बौध्द पध्दतीस प्रारंभकेला. ती पध्दतकलम ३ अन्वये रुढ झली आहे. डॉ. बाबासाहेबांनी अगदी साध्या पध्दतीने विवाह पार पाडण्यासंबंधी लिहिले आहे. एक मातीचा पाण्याने भरलेलाक्र्छुडा ठेवा. त्यामध्ये लांब धागा ठेवा; त्याचेएक टोकध्छुद्धद्धड्ड्न्ड्ड हाताद्य व दुसरे टोक वधूच्या हातात द्यावे. वधुवर शुभ्र वस्त्र परिधानकरुन उभे राहतील. कुणीही व एखाद्याने मंगलझड्डद्ध्ड्य म्हणावे अशी साधी पध्दत असावी. त्याप्रमाणेडॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवानगौतम बुध्द यांच्या प्रतिमेसमोर वधुवरत्रिशरण पंचशिल म्हणतात व शेवटीतीनवेळा साधू म्हटल्यावरद्रद्धज्ज्द्रवर्षाव केलाजातो. त्यापूर्वी वधु-वर प्रतिमांनाध्छुद्धज्ज्द्रण्ड्द्ध अर्पणकरतात. त्यांना पती-पत्नी बाबतची शपथदिलीजाते. व विवाह संपन्न होतो. असा विवाहविधी कोणीही बुध्दधम्मीय व्यक्तीउपासककिंवा भंते लावू शकतात.

निष्कर्ष :

१. पूर्वी फक्त प्राथमिक पर्यंतशिक्षणघेत होते. परंतु बुध्दधम्माच्या पालनामुळे माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदवीव्युत्तर पदवीशिक्षणघेणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

२. यापूर्वी मराठी माध्यमातूनशिक्षणघेतलेजात होते, पण १८ ते ३५ वयोगटातील युवक युवती आता ही मराठी माध्यमातूनशिक्षणघेत आहेत. परंतुत्याचबरोबर आधूनिकतंत्रज्ञानाच्या माध्यमातून ही शिक्षणघेत आहेत यामुळे शैक्षणिक बदल चांगल्या प्रकारे होत आहे असेदिसून येते.

३. हिंदू धर्मिय पध्दतीमध्ये शुद्रांवरनियम व अटी बंधने लादले होते. शुद्रांना पशुहीन हीन दर्जाची वागणूकदिलीजात होती.

४. बुध्दधम्मीय युवक युवतीडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याविचारांचे अनुकरणकरतात. यापूर्वी हिंदू धर्मिय पध्दतीनेदेवधर्म मानत होते.

५. हिंदू धर्मिय पध्दतीनेधार्मिककार्यक्रम (जसेः विवाह,नामकरण विधी, वाढदिवस ) साजरेकरत होते. परंतू बुध्दधम्माचे पालनकरत असल्यामुळे हे कार्यक्रम बुध्दधम्मीय पध्दतीने साजरे होताना दिसून येतात.

६. समाजामध्ये पूर्वी स्त्री-पुरुषांना मान-सन्मान मिळत नव्हता परंतु बुध्दधम्मामुळे मान-सन्मान अधिक मिळत आहे.

७. यापूर्वी जेष्ठ नागरीक, महिला, बालक, विधवा, परितक्त्यानिराधार यासाठीच्या योजनाशिक्षणाच्या अभावामूळे यापासून वंचित होते. परंतु बुध्दधम्माच्या पालनामुळे युवक युवतीशिक्षित झाल्यामुळे या योजनांची माहिती असल्याने प्रत्येकजण योजनांचा लाभ घेत आहेत.

८. शिक्षणामुळे जागरूकतानिर्माण झाली आहे.

९. पूर्वी आजारी पडल्यावरघरी, देवऋषी, भगत, अंधश्रध्दा याचा वापरकरुन औषधोपचारकरत होते. परंतु आता बुध्दधम्माच्या प्रचार व प्रसारामुळे आता ही परिस्थती राहीली नाही त्यामध्ये बदल होऊननवीनपिढीदवाखान्यामध्ये जाऊन औषधोपचारघेत आहेत. त्याच बरोबर आरोग्य विषयक योजनांची माहिती घेऊन लाभ घेत आहेत.

१०. शिक्षणाच्या प्रभावामुळे युवक-युवतींमध्ये शासकीय योजनांची माहिती असल्यामुळे त्या योजनांचा लाभ घेत आहेत. पूर्वी शासकीय योजनांचा माहितीचा अभाव होता.

११. आजच्या युवक-युवतींमध्ये आरक्षणा विषयी माहिती असून व ते लाभ घेत आहेत.

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याविचारांच्या अनुकरणांमुळे आजची युवक-युवतीं आंतरजातीय विवाहास मान्यतादेत आहेत. तसेच राजकीयक्षेत्रात सक्रीय, समाजविकासामध्ये सहभाग, विविध स्पर्धामध्ये सहभाग, दलित साहित्याचे वाचन, वर्तमानपत्राचे वाचन, इत्यादी होताना दिसून येते.

सूचना :

**१. बुध्दधम्मीय युवक-युवतींनीत्यांच्याकार्यक्रमामध्ये सातत्य ठेवावे.**
**२. बुध्दधम्मीय युवक-युवतींनीदर रविवारी बुध्द वंदनेसाठी बुध्द विहारात यावे.**
**३. बुध्दधम्मीय युवक-युवतींनी समाज विकासासाठीकार्यरत रहावे.**
**४. बुध्दधम्मीय युवक-युवतींनी बुध्दधम्माचा प्रचार आणि प्रसारकरावा.**
**५. बुध्दधम्मीय युवक-युवतींनी सर्वांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा.**
**६. बुध्दधम्मीय युवक-युवतींनीजास्तीतजास्त लोकांना बुध्द विहारात आणावे.**

## १. संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| महापंडीत राहूल सांकृत्यायन | बौध्द संस्कृती भारत | प्रकाशन-दीक्षा भूमि नागपूर बुध्दाब्द २५१७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वर्ष ८१, सन १९७३. |
| सौ. शारदादास जोशी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संक्षिप्त चरित्र्य व विचारधन | प्रकाशक – विद्याभारती प्रकाशन, लातूर-१२ |
| मा. वामन मेश्राम | धर्मांतराची पन्नास वर्षे एक समीक्षा | प्रकाशक - मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, केशव नगर, पुणे-३६ |
| डॉ. भीमराव रामजी आंबेडकरअनुवाद- प्रा. देवीदास घोडेस्वार, | बुध्द आणि त्यांचा धम्म | प्रकाशक- लतिकांताई गायकवाड, नागपूर-४४००१७ १३ मे २००६. |

अनुवादक श्रामणेर विमल किर्ती भिक्षु निवास,:

१. : ५ डिसेंबर २०११.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित सहावे ऐतिहासिक धम्म अभियान (स्मरणिका) २०१३ संपादक मुद्रक प्रकाशक प्रा. दि. वा. बागुल यांनी कृती क्रिएशन श्रीराम आपर्टमेंट, शनिवार पेठ येथे छापून, जी १२१, शाहूनगर, चिंचवड, पुणे-१९ येथून प्रकाशित केले.

१. प्रा. दि. वा. बागूल
२. उपासक - भाऊराव तेलगोटे, अकोला
३. उपासक - संजय हेरकर, जालना
४. उपासक - अ.क. भालेराव, अशोकरत्न मुक्ताईनगर
५. उपासक - संदिप बाबूराव महाडीक नालासोपारा मुंबई पूर्व
६. उपासक – डी.व्ही. सुरवसे, चिंचवड पृष्ट क्र. १५, १६.
७. उपासक - महेंद्र शेगावकर, अकोला
८. उपासक - अंकुश नागनाथ धावारे, किवळे, पुणे.
९. उपासिका - सुनिता भोसले, संत तुकाराम नगर, पुणे १८
१०. उपासक - विजय तुकाराम गायकवाड, पिंपरी, पुणे १८


LBP PUBLICATION